# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- नागपूर शहरातील सुयोग नगर येथील महात्मा फुले उद्यान, शंकर नगर उद्यान, नक्षत्र वन उद्यान के.टी. नगर व मेजर सुरेंद्र देव पार्क धंतोली येथे आउटडोर अँडव्हेंचर क्लाइंबिंग सेट लावण्याच्या कामाकरिता प्राकलनिय राशी रु.1,05,72,480/- चे पद. क्र.A27002441601 अंतर्गत प्रावधान देण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यास रीतसर निविदा काढण्यात येईल करिता मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**{उद्यान व वृक्ष प्रा. विभाग }**

**टीप:-**

1) मा. आयुक्त यांनी दि.17/06/2025 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.
2) पद क्र. A27002441601 अंतर्गत वर्ष 2025-26.
3) सविस्तार टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 133/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 19/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (उद्यान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील सुयोग नगर येथील महात्मा फुले उद्यान, शंकर नगर उद्यान, नक्षत्र वन उद्यान के.टी. नगर व मेजर सुरेंद्र देव पार्क धंतोली येथे आउटडोर अँडव्हेंचर क्लाइंबिंग सेट लावण्याच्या कामाकरिता प्राकलनिय राशी रु.1,05,72,480/- चे पद. क्र.A27002441601 अंतर्गत प्रावधान देण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यास रीतसर निविदा काढण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.